विधवा संबोधली जाते व पत्नी निधनानंतर पती हा विधुर समजला जातो.

मुस्लीम समाजामध्ये विधवा स्त्रीची परिस्थिती याचा अभ्यास सदर शोधनिबंधात केला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

या शोधनिबंधाचा अभ्यास करताना पूर्वीपासून म्हणजेच २० व्या शतकातील मुस्लीम स्त्रियांची भूमिका काय होती याचाही अभ्यास केला आहे. तसेच पती निधनानंतर मुस्लीम विधवेला कोणकोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते. यावरही प्रकाशझोत टाकला आहे.मुस्लीम विधवेला रोजच्या अडचणींचा सामना करावा लागतो याचाही अभ्यास केला आहे.

**अध्ययनाचे स्वरूप व संकलन तंत्रे**

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाचे महत्व लक्षात घेणे आवश्यक आहे . तथ्यामुळे संशोधकात संशोधनास विशिष्ठ स्वरूप प्राप्त होते . तथ्य संशोधनात माहितीचे स्तोत दोन प्रकारचे असतात यामध्ये प्रारंभिक तथ्य व द्वितीयक तथ्य असे म्हणतात. संशोधकाने या शोधनिबंधासाठी प्राथमिक तथ्याचा उपयोग केला आहे. हि माहिती गोळा करण्यासाठी मुलाखतीचे तंत्र वापरण्यात आले आहे. समाजातील किंवा नात्यातील विधवा महिलांच्या फोनवरून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे २० मुलाखत घेतल्या आहे. मुलाखत तंत्रामध्ये मुलाखतकाराचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करूनच त्याच्या भावना आणि मनोवृत्तीचे क्रमबद्ध अध्ययन केले जाते.

गुड आणि हॅट या संशोधकाच्या मते ‘‘मुलाखत मुळ रुपात सामाजिक आंतरक्रियेची एक प्रकिया आहे.’’

संशोधकाने २० मुलाखती औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने घेतल्या आहेत. यामध्ये व्यक्तिगत मुलाखतीचा अवलंब केला आहे. मुलाखत घेताना मुस्लीम समाजातील माहितीतील किंवा नात्यातील विधवा महिलांचा समावेश केला आहे. अभ्यासासाठी वीस महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

सदर मुलाखती घेत असताना सर्वेक्षण तंत्राचा उपयोग केला आहे. काही मुलाखती प्रत्यक्षात भेटून तर काही फोनवरून घेतल्या आहेत. सर्व महिला पुणे शहर व पुणे जिल्हा या भागातील आहे.

**विश्लेषण**

मुस्लीम समाजातील विधवा स्त्रियांच्या मुलाखती घेत असताना या महिलांना खालील अडचणी आहेत असे लक्षात आले.

१. पती निधनानंतर उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे नातेवाईक, मुलांवर अवलंबून राहावे लागते.

२. नातेवाईक किंवा मुलांनी सांभाळण्यास नकार दिल्यास पडेल ते काम करून उपजीविका करावी लागते.

३. शिक्षणाचा अभाव : पती निधनानंतर जर शिक्षण नसेल तर घरकाम यांसारखी कामे करून किंवा ज्या कामामध्ये शिक्षणाची गरज नसते अशी शारीरिक कष्टाची कामे करावी लागतात.

४. एकत्र कुटुंब पद्धती : मुस्लीम समाजात अजूनही एकत्र कुटुंबाचे प्रमाण आहे. त्यामुळे घरातील इतर पुरुष किंवा वडीलधारी माणसे स्त्रियांना बाहेर पडून काम करण्यास परवानगी देत नाही. दुसऱ्यांवर अवलंबून असल्याने त्यांना ते मान्य करणे भाग पडते.

५. अडचणी : यामध्ये विधवा स्त्रीला समाजात पूर्वी तुच्छतेचे स्थान होते असे संदर्भ वाचण्यात आले आणि काही वेळेला हा अनुभव ही सध्याच्या काळात काही अंशी मी घेतलेल्या मुलाखतीत या स्त्रियांनी दिला आहे.

**सूचना** (Suggestions)

मुस्लीम समाजातील विधवा स्त्रियांचा अभ्यास करत असताना संशोधकाने असा निष्कर्ष काढला आहे**.** स्त्री कोणत्याही समाजाची असो तिने शिक्षण घेतले पाहिजे. स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. शिक्षण घेता आले नाही तर इतर कला अवगत केल्या पाहिजे म्हणजे भविष्यात किंवा विधवेचे जीवन जगताना त्या कलेचा उपयोग करून उदरनिर्वाह करता आला पाहिजे. स्त्रीने आत्मनिर्भर होणे खूप गरजेचे आहे. सुशिक्षित स्त्री हि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेऊन ती तडीस नेऊ शकते.

विधवा स्त्री सुशिक्षित असेल तर ती आपल्या मुलांचे संगोपन हि चांगल्या पद्धतीने करू शकते, काळजी घेऊ शकते व समाजात आत्मनिर्भर पिढी निर्माण करू शकते. म्हणून मुस्लीम स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे. वाचन केले पाहिजे. वेगवेगळ्या कलांचा अंगीकार केला पाहिजे. कायद्याचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे. आधुनिक विचार सरणीचा अवलंब केला पाहिजे. नवनवीन तंत्रज्ञान शिकले पाहिजे म्हणजेच जीवनात अशा प्रकारचे प्रसंग आले तर त्याला सामोरे जाता येईल.

**निष्कर्ष**

मुस्लीम विधवा स्त्रियांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बरोबर काम केलेल्या फातिमाबी शेख या शिक्षिकेचा आदर्श ठेवून शिक्षण घेतले पाहिजे. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी समाजाच्या विरोधात जाऊन विधवा मुलींची पहिली शाळा काढून समाजातील स्त्रियांना आत्मनिर्भर होण्यास प्रवृत्त केले असा आदर्श घेवून मुस्लीम समाजातील विधवा स्त्रियांनी हि या आदर्शाचा मान ठेवला पाहिजे व स्वतः व आपले कुटुंब समाजात मानाने जगण्यास तयार केले पाहिजे.

शिक्षणाने माणसाला शहाणपण येते असे म्हणतात हे विधान अगदी खरे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. भागवत, विद्युत - स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.
२. भागवत, विद्युत अनु. - भारतातील मुस्लीम स्त्री प्रश्नाचा इतिहास, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, २००९.
३. रानडे, प्रतिभा - बुरख्या आडच्या स्त्रिया : काल आणि आज, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.
४. गुंडी, नीलिमा - स्त्री मिती निवडक मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन, मुंबई, २०१०.
५. शानेदिवान, राजेखान - मुस्लीम आत्मचरित्रे : एक दृष्टीक्षेप, भूमी प्रकाशन, लातूर, २०१०.
६. भागवत, विद्युत आणि परदेशी प्रतिमा संपा. – अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९८.
७. आगलावे, प्रदीप - संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.
८. मराठी विश्वकोश खंड १६, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई,१९९९.

***Cite This Article:***

**प्रा. फरिदा सय्यद, (2022).** मुस्लीम समाजातील विधवांची परिस्थिती : एक अभ्यास, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 186-188.*